# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.06.2025** **वार-मंगळवार**

---

**तुकाराम महाराज पालखी**

आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा उद्या दुपारी देहूतील मुख्य देऊळवाड्यातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. यासाठी देहू नगरी सजली असून सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सुमारे 500 दिंड्या देहूत दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी आज दिली.

**मुरलीधर मोहोळ**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा येत्या शुक्रवारी पुण्यात दाखल होणार आहे. यावेळी वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा आणि प्रशासनाच्या तयारीचा आढावा केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज घेतला. वारकऱ्यांच्या सुरक्षेबाबतचं नियोजन, स्वच्छतेची व्यवस्था, आरोग्य यंत्रणांची सज्जता, मुक्कामाची व्यवस्था याबाबत आवश्यक सूचना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केल्या.

**पालखी**

संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा गुरुवारी आणि शुक्रवारी पिंपरी चिंचवड शहरातही दाखल होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आयुक्त शेखर सिंह यांनी आज तयारीचा आढावा घेतला.

**जिजाऊ पुण्यतिथी**

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्याचा मूलमंत्र देणाऱ्या आणि शिवरायांना शौर्य, साहस, संस्कारांचं बाळकडू देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्तानं पुण्यात ठिकठिकाणी जिजाऊ मासाहेबांना आदरांजली अर्पण करण्यात येत आहे.

**पुणे मनपा**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य सरकारने ठरवून दिलेल्या नियमानुसारच प्रभाग रचना होईल. यात राजकीय दबावाला प्रशासन बळी पडणार नाही, असं पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं. राज्य शासनाने महापालिका प्रशासनाला प्रारूप प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. प्रारूप प्रभाग रचना तयार करून त्याला राज्य निवडणूक आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर त्यावर हरकती सूचना मागवणे, त्यावर सुनावणी घेणे, ही सर्व प्रक्रिया 4 सप्टेंबरपूर्वी पूर्ण होणार आहे.

**मेधा कुलकर्णी**

कुटुंबात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होण्यासाठी कुटुंबातील ज्येष्ठांना सन्मानाची वागणूक देत एकत्र कुटुंब पध्दतीचं पुनरूज्जीवन करणं आवश्यक असल्याचं मत खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. जागतिक ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जनजागृती दिनानिमित्त सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयानं विविध संस्थांच्या सहयोगानं आयोजित

केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ज्येष्ठांचा आदर सन्मान राखून त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ होणार नाही, याची काळजी घेण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी केली.

**पुण्यभूषण**

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि यंदाच्या पुण्यभूषण पुरस्काराचे मानकरी डॉ. विजय केळकर यांच्याशी वार्तालापाचा कार्यक्रम आज पुण्यात आयोजित करण्यात आला होता. जीएसटी प्रणालीमधील असमानता दूर करून त्यात अधिक सुसूत्रता आणून राष्ट्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवर त्याचं समान वाटप केल्यास देशाची अर्थव्यवस्था अधिक गतीनं विकास साधेल असा विश्वास डॉ. विजय केळकर यांनी यावेळी व्यक्त केला. येत्या सोमवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि प्रा. एम.एम. शर्मा यांच्या हस्ते डॉक्टर केळकर यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**पुलांचं सर्वेक्षण**

पुणे शहरात एकंदर 86 मोठे तर 170 लहान पुल आहेत. त्यापैकी 38 पुलाचं संरचनात्मक सर्वेक्षण करण्यात आलं आहे. त्यापैकी 11 पुलांच्या दुरूस्तीचं काम सुरू असून 23 पुलांचं संरचनात्मक सर्वेक्षण तातडीनं केलं जाणार आहे. कुंडमळा इथं नुकत्याच झालेल्या दुर्घटनेनंतर पुणे महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

**जलजन्य आजार**

पुणे शहरात मे महिन्यापासून अतिसार, गॅस्ट्रो, कावीळ आणि विषमज्वर यासारख्या जलजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. दूषित पाणी अथवा अन्नामुळे या आजारांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

**दूधविक्री**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ म्हणजे कात्रज डेअरीने दूध विक्री दरात दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी ही माहिती दिली.

**क्रीडा**

विद्यार्थी कुस्ती परिषदेच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध वजनी गटाच्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. यामध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्रीय मंडळ तालीम संघाचा शौनक झोरे, तर मुलींच्या गटात खाशाबा जाधव कुस्ती संकुलातील रिद्धी थोपटे यांनी मानाची किताबी गदा पटकावली. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील एकोणीस कुस्ती केंद्रांनी सहभाग घेतला होता.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसानं काहीशी विश्रांती घेतली; मात्र आकाश अंशतः ढगाळ होतं. आज कमाल तापमान 31 आणि किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**